भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र.२८९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २५/०४/२०१७

१) समोरील दाराला लावलेला कुलुप तोडुन लोखंडी आलमारी मधुन सोन्या,चांदीचे दागीने व पैशाची चोरी केल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २४/०४/२०१७ चे १२.००ते १३.३० वा. दरम्यान यातील फिर्यादीचे घराचे समोरील दाराला लावलेला कुलुप कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन कुलुप तोडुन आत प्रवेश करून घरातील लोखंडी आलमारी मधुन १ सोन्याचा मंगळसुत्र ५ ग्रॅम, १ सोन्याची अंगठी ५ ग्रॅम, सोन्याचे १जोड कानातील बिऱ्या ४ ग्रॅम, चांदीचे पायपट्या २ जोड ४० ग्रॅम, चांदीचे जोडवे १ जोड २० ग्रॅम, व नगदी ९०००/–रू. असा एकुन २८,२००/–रू. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी घनश्याम तुळशीराम गभणे वय ४० वर्ष रा जांभ यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ४५४,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना केने पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

२) संगनमत करून शिवीगाळ ,दगड मारून ,बुक्यानी मरपीठ करून दात पाडुन गंभीर जखमी करून जातीवाचक शिवीगाळ केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक २३/०४/२०१७ चे २२.०५ वा. दरम्यान यातील फिर्यादी हे आरोपी क्र. सोबत लग्नाचे कार्यक्रम आटोपुन परत येत असतांना आरोपी क्र. १ याने फिर्यादीस शिवीगाळ केल्याने फिर्यादीने आरोपी क्र. १ यास दोन थापडा मारल्या त्यावरून आरापी क्र. १ हा गावी पोहचल्या नंतर फिर्यादीस दगड फेकुन मारल्याने फिर्यादी हा आरोपी क्र.१ चे वडीलाकडे तक्रार करण्यास जात असता यातील आरोपींनी फिर्यादीस मारारे असे बोलुन धावुन आले आरोपी क्र. ३ याने फिर्याउदीची कंबरे पकडुन ठेवली आणी आरोपी क्र. २ याने फिर्यादीचा दुप्पटा हिसकावुन खिशातील १०००/– रू. काढले व छातीवर, हातावर व तोंडावर बुक्यांनी मारून जखमी केले त्यामुळे फिर्यादीचे तीन दात पडले असुन चारही आरोपींना फिर्यादीची जात माहीत असुन सुध्दा त्साचा अपमान करण्याचे उद्देशाने महाऱ्या, धेडयाअशी जाती वाचक शिवीगाळ केल्याने फियादी महेंद्र वासुदेव दहीवले वय ५७ वर्ष रा.चिकना यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ३२५,३४ भादंवि. सहकलम ३ (१) (आर) (एस) ,३( II a)अ.जा.ज.अ.प्र.का. अधिनीयम २०१५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला, पुढील तपास श्री.संखे उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग साकोली पो.स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

३) धुऱ्याला आग लावुन ती आग न विझवता पसरत जावुन शेतातील पाईप,तनसीचे ढिग व ईतर उपयोगी वस्तु जळुन नुकसान झाल्याने गुन्हा नोंदः–

दिनांक २३/०४/०१७ चे १६.०० ते १६.३३ वा. दर. यातील आरोपीने त्याचे शेतातील धुऱ्याला आग लावुन ती आग न विझवता घरी निघुन गेला व आग ही पसरत फिर्यादी चे शेतात जावुन सदर आगेमुळे फिर्यादीचे शेतातील पाईप, तनसीचे ढिग व ईतर शेती उपयोगी वस्तु जळुन अंदाजे ३०,०००/– रू. चे नुकसान झाल्याने फिर्यादी महीपाल अभिमन राऊत वय २६ वर्ष रा. कोरंबी ने पो.स्टे. पवनी येथे कलम २८५ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. बिसने पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

४) सार्वजनिक ठिकाणी धोकादायक रित्या व वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अश्या स्थितीत वाहन उभे करून ठेवल्याने गुन्हा नोंद:–

दिनांक २४/०४/०१७ चे १७.०० ते १७.३० वा. दर. यातील आरोपीने आपले ताब्यातील वाहन आमरोड वर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस तसेच लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत ऊभी करतांनी मिळुन आल्याने पो.स्टे. पवनी येथे कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोडवते पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

५) जादुटोना, पाहुन घेंण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक २२/०४/२०१७ चे ०८.३० वा. दरम्यान यातील हे गावातील हनुमान मंदीर झाडण्याकरिता गेला असता यातील आरोपी हा मंदीरात येवुन फिर्यादीला म्हणाला कि तुझ्या जवळ जादु किती आहे तु माझी मुलगी कु. रूपाली हिला लग्नाकरिता चागंले पाहुणे येवु देत नाही. मरीत पाहुने येवु देतो. तु सर्व रस्ते बांधलेले आहे. तु रस्ते मोकडे कर नाहीतर तुला मी पाहुणे घेईन अशी धमकी दिल्याने फिर्यादी विजय कुंडलीक सतीबावने वय ५१ वर्ष रा. वाही यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ५०६ भादंवि. सहकलम २ (१) (ख)(६),२(२) महाराट्र जादुटोना प्रतीबंधक कायदा २०१३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि डहाके पो. स्टे.पवनी हे करीत आहेत.

६) ढाब्यावर घरगुती गॅस,सिलेंडरचे अवैधरित्या वापर व्यवसाय,कामारिता वापर केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक २४/०४/२०१७ चे १९.३० वा.दरम्यान यातील फिर्यादी यांना आरोपीचे ढाब्यावर अवैधरित्या घरगुती इंडीयन कंपनीचे ६ गॅस सिलेंडर, १ शेगडी सिंगल बर्नरची एकुन किंमती ४,५५०/रू.चा साठा मिळुन आल्याने तसेच गॅस शेगडीला लावुन घरगुती सिलेंडरचा वापर व्यवसाय कामा करिता होत असल्याने मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सपानि चौधरी यांचे बयान वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३,७ जिवनावश्यक वस्तु अधि. १९५५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि गदादे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत आरोपी अटक आहे.

७) संगनमत करून फसवणुक, हुंडयाची मागणी करून, जोडलेला विवाह तोडुन समाजामध्ये मानहानी केलयाने गुन्हा नोंद . :–

दिनांक ०२/१२/२०१६ ते २४/०४/२०१७ पर्यत यातील आरोपी क्र. १ याचे त्याचे गावातील मुलीशी प्रेम संबध असुन सुध्दा आरोपी क्र.२ व ३ यांच्याशीसंगनमत करून फिर्यादीचे मुलीशी विवाह जोडला व २,००००० /–रू. हुंडयाची मागणी करून फिर्यादीचे मुलीशी जोडलेला विवाह तोडला आणी फिर्यादीची व मुलीची समाजामध्ये मानहानी केल्याने फिर्यादी सुभास नामदेव चोपकर वय ५३ वर्ष रा. सालई बु. यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४२०,५००,३४ भादंवि. सहकलम ४ हुंडा प्रतिबंधक कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत

८) घराचे खुल्या दारातुन फुलपॅटचे खिशातुन मोबाईल व एटीएमची कार्ड चोरी केल्याने गुन्हा नोंद:–

दिनांक २४/०४/०१७ चे ०२.०५ वा. दर. यातील फिर्यादीचे राहते घराचे खुल्या दारातुन रात्र दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने आत प्रवेश करून फिर्यादीचे फुलपॅन्टचे खिशातुन कार्बन कंपनीचा स्मार्ट फोन, महाराष्ट्र बॅंकेचे एटीएम कार्ड बिडीसीसी बॅंकेचे एटीएम कार्ड असा एकुन २०००/–रू. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी मुंकुद कवडु पारधी वय ३१ वर्ष रा. श्रीराम नगर तुमसर याने पो.स्टे. तुमसर येथे कलम ३८० भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. पडोळे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

(सपोनि. श्री. जि.एम. काळे )
पोलीस अधिक्षक कार्या. भंडारा
दुरध्वनी.क्र. ९०२११२८२०३५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.